शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ११ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना जिल्ह्यात १८ हजार २७६ कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची माहिती ; मराठा समाजाच्या मागण्याबाबत शासन सकारात्मक, उपोषण मागे घेण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीत जालना जिल्ह्यात एकूण ५ हजार २७ नोंदी आढळल्या आहेत. या नोंदींच्या आधारे जिल्ह्यात प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर करून जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. मंजूर अर्जांचे प्रमाण ९९.९ टक्के आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्य शासनाने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या १५ मागण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतले आहेत. त्यामुळे श्री. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मराठा-कुणबी समाजाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासन व जिल्हा प्रशासनाने मागील तीन वर्षांत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी यावेळी दिली.

सामाजिक सलोखा कायम राखण्यावर भर महाराष्ट्र हे प्रगतिशील, आधुनिक आणि विकासाभिमुख राज्य आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी मतभेद टाळून शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करावे. मानवता ही प्रत्येकाची पहिली ओळख असली पाहिजे. जिल्ह्यातील तीन लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी सामाजिक सलोखा आणि मानवतेचा संदेश देणारी दैनंदिन प्रार्थना करत आहेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सांगितले. श्री. मनोज जरांगे



पाटील यांच्या आरोग्याची तपासणी आणि उपचारांसाठी वैद्यकीय पथक चोवीस तास कार्यरत आहे. त्यांची प्रकृती डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आहे. शासनाने विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले असून, उर्वरित प्रकरणांवर कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही सुरू आहे. प्रत्येक प्रशासकीय कार्यवाही निर्धारित कायदेशीर प्रक्रियेतच पूर्ण करावी लागते. त्यामुळे श्री. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी केले. श्रीमती मित्तल म्हणाल्या की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. जिल्ह्यात अवैध मद्यविक्रीविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून, नऊ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. परिसरातील मद्यबंदी पुढील आदेशापर्यंत सुरू राहणार आहे. अंतरवाली सराटी गावातील शाळा, अंगणवाडी आणि अन्य पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**अर्ज नामंजूर होण्याचे प्रमाण नगण्य**

श्रीमती मित्तल म्हणाल्या की, निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीनंतर प्राप्त नोंदीच्या आधारे प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर केले असून उर्वरित १९ अर्जांमध्ये इतर जिल्ह्यांतील पुरावे असल्याने ते नामंजूर करण्यात आले. अर्ज नामंजूर होण्याचे प्रमाण केवळ ०.१ टक्का आहे. सध्या जिल्ह्यात जात प्रमाणपत्र वितरणासाठी एकही अर्ज प्रलंबित नाही. तालुकानिहाय मंजूर अर्जांमध्ये जालना तालुक्यात १ हजार ३४०, बदनापूर १ हजार ४३६, अंबड ३ हजार १८५, घनसावंगी ५४०, भोकरदन ६ हजार ३१८, जाफ्राबाद ९९४, परतूर २ हजार ४१८ आणि मंठा तालुक्यात २ हजार ४५ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

**हैदराबाद गॅझेटिअरनुसार ३७७ प्रमाणपत्रांचे वितरण**

दि. २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे जिल्ह्यात एकूण ४२१ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ३७७ अर्ज मंजूर करून प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले, तर ४४ अर्ज नामंजूर करण्यात आले. या प्रक्रियेतील एकही अर्ज सध्या प्रलंबित नाही. समितीच्या तपासणीत आढळलेल्या सर्व नोंदी आणि नोंदींची यादी जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवरही संबंधित याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

**महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरे**

पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये आवश्यक पुराव्यांसह कागदपत्रे सादर करून पात्र नागरिकांनी अर्ज करावा, असे आवाहन श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले. आज दि. १० सप्टेंबर रोजी जालना जिल्हयातील देवमुर्ती,सावंगी तलाव (जालना), बदनापूर,(बदनापूर) , अंबड (अंबड) , कुंभार पिपळगाव , राणी उंचेगाव (घनसावंगी), आष्टी, (परतूर) ,पांगरी गोसावी (मंठा), आन्वा, दानापूर, पिंपळगाव रेणूकाई (भोकरदन) ,माहोरा(जाफ्राबाद) अशा एकुण १२ महसूल मंडळात शिबीर आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर शिबीरात आतापर्यंत २२ अर्ज प्राप्त झाल्याबाबत प्राथमिक माहिती असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पात्र नागरिकांनी उपलब्ध नोंदी तपासून आवश्यक पुरावे आणि कागदपत्रांसह विशेष शिबिरांमध्ये अथवा संबंधित तहसील कार्यालयात अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

**एसईबीसी आरक्षणांतर्गत ३५ हजार ९८१ प्रमाणपत्रे**

जालना जिल्ह्यात मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणानुसार वर्ष २०२४ ते २०२६ या कालावधीत एकूण ३५ हजार ९८१ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये २०२४ मध्ये १० हजार ३५, २०२५ मध्ये १६ हजार १८० आणि २०२६ मध्ये ९ हजार ७६६ प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तालुकानिहाय जालना येथे ५ हजार १७५, बदनापूर ३ हजार २०, भोकरदन ७ हजार ७५, जाफ्राबाद ३ हजार ५४१, परतूर ५ हजार ३००, मंठा ३ हजार ४००, अंबड ४ हजार ६४८ आणि घनसावंगी तालुक्यात ३ हजार ८२२ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

**जात पडताळणीची १ हजार १६ प्रकरणे वैध**

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे एकूण १ हजार ६६४ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १ हजार १६ प्रकरणे वैध ठरविण्यात आली आहेत. २३ प्रकरणे अवैध ठरली असून, आवश्यक पुरावे व त्रुटींची पूर्तता न केल्याने १३३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. सध्या ४९२ अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी ४७३ अर्ज ९० दिवसांच्या आतील, तर १९ अर्ज ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीतील आहेत.प्रलंबित प्रकरणांचा नियमानुसार लवकरात लवकर निपटारा करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.तक्रार निवारणासाठी *(पान २ वर)*

# स्वच्छता निविदेवरून महासभेत प्रशासनाची कोंडी

## दोन दिवसांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश; वर्षभर रखडलेल्या १५ कोटींच्या निविदेवर सदस्यांचा संताप

**जालना । प्रतिनिधी**

शहराच्या स्वच्छतेसाठी प्रस्तावित असलेली तब्बल १५ कोटी रुपयांची निविदा वर्षभरापासून रखडल्याने गुरुवारी झालेल्या जालना महानगरपालिकेच्या महासभेत प्रशासनाची चांगलीच कोंडी झाली. शहरात कचऱ्याचे ढीग, तुंबलेले नाले आणि अस्वच्छतेच्या तक्रारी कायम असताना स्वच्छतेची निविदा अंतिम टप्प्यातही का पोहोचत नाही, असा सवाल नगरसेवकांनी उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले.

स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह सदस्यांनी निविदा प्रक्रियेतील विलंबाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. चार संस्थांनी निविदा दाखल केल्या असून प्रत्येक संस्थेने सुमारे १२०० कागदपत्रे सादर केल्याने छाननीस वेळ लागत असल्याचे उपायुक्त नंदा गायकवाड यांनी सभागृहात स्पष्ट केले. मात्र, लेखाधिकारी रामेश्वर माने यांच्या कथित असहकार्यामुळे सुमारे दोन महिन्यांचा विलंब झाल्याचा दावा त्यांनी केला. माने यांनी हे आरोप फेटाळून लावत आपल्याकडून जाणीवपूर्वक विलंब झालेला नसल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, आयुक्त अंजली शर्मा यांनी माने यांना यापूर्वी दोन नोटिसा बजावण्यात आल्या असून त्यांना उत्तर प्राप्त झाले नसल्याचे सभागृहात सांगितले. त्यानंतर माने यांना निलंबित करून शासनाकडे परत पाठविण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. महापौर वंदना मगरे यांनी माने यांना सभागृहाबाहेर जाण्याचे निर्देश दिले.

याचवेळी वर्षभर प्रलंबित असलेल्या स्वच्छता निविदेची प्रक्रिया आता कोणत्याही परिस्थितीत आणखी लांबवू नये आणि दोन दिवसांत प्रक्रिया पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. त्यामुळे आता प्रशासन दिलेल्या मुदतीत निविदा प्रक्रिया पूर्ण करते का, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. महानगरपालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेसाठी प्रस्तावित निविदा मागील वर्षभरापासून विविध कारणांनी प्रलंबित







आहे. या कालावधीत निविदेच्या अटी व प्रक्रियेत तब्बल सहा वेळा सुधारणा करण्यात आल्याची माहिती महासभेत समोर आली. एकीकडे निविदेची प्रक्रिया कागदपत्रांच्या छाननीत अडकली असताना दुसरीकडे शहरातील स्वच्छतेची परिस्थिती नागरिकांसाठी गंभीर बनत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग, नाले तुंबणे, नियमित साफसफाईचा अभाव आणि डासांचा वाढता प्रादुर्भाव अशा समस्या कायम आहेत. स्वच्छतेसारखी अत्यावश्यक सेवा देण्यासाठीची निविदाच वर्षभर पूर्ण होत नसेल तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होणारच, अशी भूमिका सदस्यांनी घेतली. उपायुक्त नंदा गायकवाड यांनी सभागृहात निविदेच्या सद्यस्थितीचा आढावा दिला. चार संस्थांनी निविदा दाखल केल्या असून प्रत्येक संस्थेकडून सुमारे १२०० कागदपत्रे प्राप्त झाली आहेत.

निविदाधारकांची पात्रता, तांत्रिक निकष, आर्थिक क्षमता, अनुभव, अटी-शर्ती आणि विविध आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे आवश्यक असल्याने प्रक्रिया वेळखाऊ असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मात्र, निविदेची कागदपत्रे मोठ्या प्रमाणात असल्याचे कारण देऊन वर्षभर प्रक्रिया प्रलंबित ठेवणे योग्य आहे का, असा सवाल सदस्यांनी उपस्थित केला. प्रशासनाकडे आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रणा असताना निविदा वेळेत निकाली का निघाली नाही, याचे उत्तरही मागण्यात आले.

निविदा प्रक्रियेतील विलंबाचे खापर लेखाधिकारी रामेश्वर माने यांच्यावर फोडण्यात आल्याने महासभेत प्रशासनातील अंतर्गत समन्वयाचा मुद्दा ऐरणीवर आला.

उपायुक्त नंदा गायकवाड यांनी निविदेच्या तपासणीदरम्यान माने यांच्याकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नसल्याचा दावा केला. त्यांच्या असहकार्यामुळे सुमारे दोन महिन्यांचा विलंब झाल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले. मात्र, माने यांनी हा आरोप फेटाळला. निविदेतील कागदपत्रांची तपासणी ही नियमांनुसार आणि काळजीपूर्वक करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नेमका विलंब कोणत्या कारणामुळे झाला, यावर प्रशासनातील वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकांमध्ये विरोधाभास असल्याचे महासभेतील चर्चेतून स्पष्ट झाले. महासभेत वातावरण तापले असतानाच आयुक्त अंजली शर्मा यांनी लेखाधिकारी रामेश्वर माने यांना यापूर्वी दोन नोटिसा देण्यात आल्याची माहिती दिली. या नोटिसांना अद्याप उत्तर मिळाले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर माने यांना निलंबित करून शासनाकडे परत पाठविण्याचा ठराव सभागृहात मंजूर करण्यात आला. महापौर वंदना मगरे यांनी माने यांना सभागृहाबाहेर जाण्याचे निर्देश दिले.

या कारवाईमुळे स्वच्छता निविदेच्या प्रश्नाला प्रशासनातील अधिकारीवर्गातील जबाबदारी आणि उत्तरदायित्वाचा नवा आयाम मिळाला आहे.

महासभेत केवळ निविदेच्या विलंबावरच प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही, तर सध्याच्या स्वच्छता व्यवस्थेवरही सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

महानगरपालिकेकडे १६ स्वच्छता निरीक्षक असताना शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग का दिसतात, असा थेट सवाल करण्यात आला.

स्वच्छता निरीक्षकांनी केवळ कार्यालयात बसून अहवाल तयार न करता प्रभागांमध्ये प्रत्यक्ष फिरून पाहणी करावी, सफाई कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि कामाची तपासणी करावी, तसेच हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. काही सदस्यांनी शहर पूर्णपणे स्वच्छ होईपर्यंत सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन रोखण्याची मागणीही केली. वर्षभर रखडलेल्या निविदेला आणखी मुदतवाढ न देता दोन दिवसांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याने प्रशासनासमोर आता स्पष्ट डेडलाइन आहे. मात्र, निविदा मंजूर होणे ही केवळ पहिली पायरी आहे. प्रत्यक्षात कंत्राटदारामार्फत शहरातील स्वच्छता व्यवस्था सुधारते का, नियमित कचरा संकलन होते का, नाल्यांची स्वच्छता होते का आणि नागरिकांच्या तक्रारी कमी होतात का, हे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. दोन दिवसांत कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण झाली तरी शहराच्या रस्त्यावर स्वच्छता दिसण्यासाठी पुढील कृती किती वेगाने होते, याचीही कसोटी प्रशासनाचीच असणार आहे. स्वच्छता निविदेबरोबरच गुरुवारच्या महासभेत शहरातील विविध मूलभूत सुविधांवरही सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. सार्वजनिक वाहतूक, क्रीडा सुविधा, पाणीगळती, स्वच्छतागृहे, सॅनिटरी कचरा, पार्किंग, रस्ते, नाले, स्मशानभूमी, मनपा शाळा, अग्निसुरक्षा आणि विकासकामांच्या पारदर्शकतेपासून अनेक विषयांवर चर्चा झाली.

राजमाता जिजाऊ योजनेअंतर्गत *(पान २ वर)*

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना – प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जालना यांच्या माध्यमातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अनाथ, निराधार, एकल पालक असलेली बालके, दुर्धर आजाराने बाधित पालकांची बालके, कैद्यांची मुले, दिव्यांग, अंध तसेच मतिमंद बालकांना बाल कल्याण समितीच्या शिफारशीनुसार दरमहा २ हजार २५० रुपयांचा आर्थिक लाभ दिला जातो. या योजनेच्या पात्रतेच्या अटी व शर्ती तसेच सविस्तर माहिती क्यूआर कोडद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र व गरजू लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी परिपूर्ण अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे. अर्जदारांनी अर्ज कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीमार्फत सादर करू नये. अर्ज स्वतः जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, तळमजला, जालना येथे अथवा संबंधित तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय किंवा तालुका संरक्षण अधिकारी, पंचायत समिती/तालुका कार्यालय येथे सादर करता येईल. या योजनेसाठी कार्यालयाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. योजना पूर्णपणे मोफत असून, अर्ज प्रक्रिया किंवा योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीस पैसे देऊ नयेत. लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक झाल्यास त्याची जबाबदारी कार्यालयाची राहणार नसल्याची सूचना करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र व गरजू लाभार्थ्यांनी कोणत्याही मध्यस्थाच्या भूलथापांना बळी न पडता संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण - डॉ. विद्या पटवारी

**जालना – प्रतिनिधी**

माय भारत जालना, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार वश्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत यंग लीडर डायलॉग () क्विझ स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या स्पर्धेला महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदरील कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, जालना येथील मयूरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. विद्या पटवारी, जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे, प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव, उपप्राचार्य पूजा कक्कड, कार्यक्रम अधिकारी प्रा. पार्वती देशमुख तसेच डॉ. सुधाकर वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रा. डॉ. विद्या पटवारी यांनी विद्यार्थ्यांना विकसित भारत यंग लीडर डायलॉग () उपक्रमाची माहिती दिली. देशाच्या विकास प्रक्रियेत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, युवकांमध्ये नेतृत्वगुण, ज्ञान, निर्णयक्षमता आणि राष्ट्रनिर्मितीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मयूरकुमार गोरमे यांनी स्पर्धेचे महत्त्व स्पष्ट करताना युवकांनी अशा उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांनी आपल्या ज्ञानाचा, कौशल्यांचा आणि कल्पनाशक्तीचा सकारात्मक उपयोग करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

क्विझ स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत विविध प्रश्नांची उत्तरे दिली. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानासोबतच देशाच्या इतिहास, संस्कृती, विज्ञान, अर्थव्यवस्था आणि विकासविषयक बाबींच्या ज्ञानाला चालना मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# संपादकीय...

## ग्रामीण पत्रकारांच्या सुरक्षेचा स्वतंत्रपणे विचार हवा

'पोलिसांना माहिती का दिली?', 'तू लय मोठा पत्रकार झाला का?' आणि त्यानंतर मारहाण व जिवे मारण्याची धमकी परतुर तालुक्यातील ब्राम्हणाथ तांडा परिसरात वार्ताहराला झालेल्या कथित मारहाणीची घटना केवळ दोन व्यक्तींमधील वाद म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. या घटनेत आरोपांची सत्यता पोलीस तपासातून निश्चित होईल; मात्र, तक्रारीत नमूद करण्यात आलेले शब्द आणि घटनाक्रम पत्रकारितेच्या स्वातंत्र्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारे आहेत. पत्रकाराने पोलिसांना माहिती दिली म्हणून त्याच्यावर दबाव आणला जात असेल, त्याला मारहाण केली जात असेल किंवा जिवे मारण्याची धमकी दिली जात असेल, तर हा प्रकार केवळ एका वार्ताहराला लक्ष्य करणारा नसून 'सत्य बाहेर आणण्याची किंमत मोजावी लागेल' असा संदेश देण्याचा प्रयत्न ठरू शकतो. लोकशाही व्यवस्थेत पत्रकाराचे मूलभूत कामच प्रश्न विचारणे, माहिती मिळवणे, घटनांची नोंद करणे आणि ती जनतेसमोर मांडणे हे आहे. एखाद्या घटनेची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचली किंवा एखाद्या प्रकरणाची बातमी प्रसिद्ध झाली म्हणून संबंधित पत्रकाराला 'तू माहिती का दिलीस?' असा जाब विचारणे ही मानसिकता चिंताजनक आहे. पत्रकाराने कोणाची बाजू घेतली, कोणाविरुद्ध बातमी केली किंवा कोणती माहिती दिली, यावर मतभेद असू शकतात. बातमी चुकीची वाटत असेल तर तिचे खंडन करता येते. कायदेशीर आक्षेप नोंदविता येतो. संपादकांकडे तक्रार करता येते. पोलिसांत तक्रार करता येते. न्यायालयाचा मार्ग खुला आहे. मात्र, उत्तर म्हणून हातात पाईप किंवा काठी घेणे हा लोकशाही संवादाचा मार्ग नाही. 'तू मोठा पत्रकार झाला का?' हा कथित सवाल या घटनेतील सर्वात अस्वस्थ करणारा भाग आहे. पत्रकार किती मोठा आहे, हा प्रश्न महत्त्वाचा नाही. तो गावातील वार्ताहर असो, तालुका प्रतिनिधी असो किंवा राष्ट्रीय माध्यमाचा पत्रकारपत्रकारितेचे स्वातंत्र्य व्यक्तीच्या पदावर किंवा प्रसिद्धीवर अवलंबून नसते. गावागावांत काम करणारा वार्ताहर अनेकदा कोणत्याही मोठ्या कार्यालयीन यंत्रणेच्या संरक्षणाशिवाय घटनास्थळी पोहोचतो. स्थानिक पातळीवरील गैरप्रकार, गुन्हेगारी, प्रशासनातील त्रुटी, सामाजिक प्रश्न आणि नागरिकांच्या समस्या तो नोंदवतो.

त्यामुळे ग्रामीण आणि तालुका पातळीवर काम करणाऱ्या पत्रकारांच्या सुरक्षिततेकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. या प्रकरणात 'पोलिसांना माहिती का दिली?' हा प्रश्न उपस्थित झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोगुन्हा किंवा संशयास्पद घटना पोलिसांच्या निदर्शनास आणून देणे चुकीचे आहे का? कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी पोलिसांची आहे. नागरिकांनी गुन्ह्याची माहिती देणे ही समाजाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक बाब आहे. पत्रकारांकडे एखादी माहिती आली तर तिची सत्यता तपासणे, संबंधितांची बाजू घेणे आणि आवश्यक असल्यास ती पोलिसांच्या निदर्शनास आणणे हे त्यांच्या कामाचा भाग असू शकते. एखाद्याला ती माहिती चुकीची वाटत असेल तर त्याला कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. धमकी किंवा हिंसा हा त्याला पर्याय होऊ शकत नाही. पत्रकारावर हल्ला झाला की केवळ एका व्यक्तीला दुखापत होत नाही. त्याचा परिणाम पुढील बातमीवर, पुढील प्रश्नावर आणि पुढील पत्रकारावरही होतो.

आज एका वार्ताहराला 'हे का सांगितले?' म्हणून धमकावले गेले, तर उद्या दुसरा पत्रकार एखाद्या घटनेची माहिती देण्यापूर्वी दहा वेळा विचार करू शकतो. यातून भीतीचे वातावरण तयार होण्याची शक्यता असते. आणि पत्रकार घाबरला, प्रश्न विचारणे थांबले किंवा माहिती दडपली गेली, तर त्याचा सर्वाधिक तोटा सामान्य नागरिकांचा होतो. या प्रकरणात परतूर पोलीस ठाण्यात तक्रारीवरून संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल झाल्याचे नमूद आहे. आता पुढील तपास निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने होणे आवश्यक आहे.

तक्रारीतील आरोप खरे आहेत की नाहीत, मारहाण नेमकी कशी झाली, घटनास्थळी कोण उपस्थित होते, कथित शस्त्रे किंवा वस्तूंचा वापर झाला का, धमकी दिल्याचा आरोप कितपत सत्य आहेया सर्व बाबी तपासातून स्पष्ट होणे गरजेचे आहे. पत्रकार असल्यामुळे विशेष सवलत नको; पण पत्रकार असल्यामुळे तक्रारीकडे दुर्लक्षही नको. कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. याचबरोबर पत्रकारितेच्या क्षेत्रानेही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. पत्रकारितेचे स्वातंत्र्य म्हणजे कोणावरही बेछूट आरोप करण्याचा अधिकार नव्हे. कोणतीही माहिती प्रसिद्ध करण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, संबंधितांची बाजू घेणे, अफवा आणि तथ्य यातील फरक ओळखणे आणि कायदेशीर व नैतिक चौकटीचे पालन करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे. स्वातंत्र्य आणि जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र, एखाद्या बातमीवर आक्षेप असेल तर त्याचे उत्तर पत्रकाराला मारहाण करून नव्हे, तर तथ्य आणि कायद्याच्या माध्यमातून दिले पाहिजे. शहरी भागातील मोठ्या माध्यमसंस्थांमध्ये काम करणाऱ्या पत्रकारांच्या तुलनेत ग्रामीण भागातील वार्ताहरांची परिस्थिती वेगळी असते. ते आपल्या गावातच राहतात, स्थानिक लोकांशी त्यांचे दैनंदिन संबंध असतात आणि अनेकदा त्याच व्यक्तींच्या परिसरात त्यांना पुन्हा पुन्हा काम करावे लागते. अशा परिस्थितीत धमकी, सामाजिक दबाव, बहिष्कार किंवा हिंसाचाराचा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. म्हणूनच पत्रकारांवरील हल्ल्यांच्या घटनांकडे 'स्थानिक वाद' म्हणून पाहण्याऐवजी त्यातील पत्रकारितेशी संबंधित पैलूही तपासले पाहिजेत. लोकशाहीत प्रत्येक बातमी प्रत्येकाला आवडेलच असे नाही. कधी एखाद्या राजकीय नेत्यावर टीका होईल, कधी प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होतील, कधी पोलिसांच्या कारवाईवर चर्चा होईल, तर कधी एखाद्या नागरिकाच्या तक्रारीला प्रसिद्धी मिळेल. यातील कोणत्याही गोष्टीशी असहमती असण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. पण असहमती व्यक्त करण्याचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकाच पत्रकाराला प्रश्न विचारण्याचा अधिकारही महत्त्वाचा आहे. बातमी चुकीची असेल तर उत्तर द्या. आरोप खोटे असतील तर तथ्य मांडा. बदनामी झाली असेल तर कायदेशीर मार्ग स्वीकारा. पण पत्रकाराला मारहाण करून बातमी थांबविता येत नाही; उलट त्या घटनेचा प्रश्न अधिक मोठा होतो.पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा फक्त पत्रकार संघटनांचा प्रश्न मानणे चुकीचे ठरेल. स्वतंत्र पत्रकारिता ही नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराशी जोडलेली आहे.

# आमची अंगणवाडी आमची जबाबदारी या संकल्पनेवर आधारित ९ व्या राष्ट्रीय पोषण माहचे आयोजन

**जालना – प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि जिल्हा परिषद, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संपूर्ण

जिल्ह्यात'राष्ट्रीय पोषण माह २०२६'अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'सुपोषित बालक, निरोगी माता आणि सक्षम समाज' हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असून यंदा'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी'या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीडॉ. कृष्ण कांत कनवरीयायांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बाल

विकास, शिक्षण आणि आरोग्य विभागाच्या समन्वयातून जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत अंगणवाडी व्यवस्थापन समित्या अधिक सक्रिय करून अंगणवाडी केंद्रांमधील स्वच्छता, आहाराचा दर्जा आणि स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, ३ ते ३० वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठीअंगणवाडी सेविकांमार्फत नियोजनबद्ध गृहभेटी घेऊन पालकांना बालसंगोपन, आरोग्य आणि पोषणाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. बालकांच्या आहारात पुरेशा प्रथिनांचा समावेश, विविध अन्नगटांचा वापर आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध

पौष्टिक अन्नपदार्थांचा वापर याबाबत जनजागृती केली जाणार आहे. पूरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत ताजे, विविध प्रकारचे व गरम शिजवलेले भोजन उपलब्ध करून देण्याबरोबरच साप्ताहिक मेनूमध्ये विविधता, स्वच्छता आणि आहाराच्या गुणवत्तेची हमी यावर विशेष भर देण्यात येणार आहे. नव्याने गठित अंगणवाडी व्यवस्थापन समित्या तसेच मेनू बोर्डयांच्या माध्यमातून पोषणविषयक

उपक्रमांमध्ये समुदायाचा सहभाग, मालकीभाव आणि उत्तरदायित्व वाढविण्यात येणार आहे. प्रारंभिक बाल संगोपन व शिक्षण () कार्यक्रमांतर्गत बालकांचा संज्ञानात्मक विकास आणि पुरेसे पोषण हे परस्परपूरक घटक असल्याचे अधोरेखित करण्यात येणार आहे. मातृ वंदना योजनेची विशेष मोहीम प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गतपात्र महिलांना योजनेचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी विशेष कागदपत्र

पूर्तता व नोंदणी मोहीम राबविण्यात येणार आहे. यासोबतच महिला मेळावे, माताबैठका, रॅली, पथनाट्य, गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला व रांगोळी स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीतही पोषण, आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राष्ट्रीय पोषण माह अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, लोकप्रतिनिधी, स्वयं-सहायता बचत गट तसेच पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीडॉ. कृष्ण कांत कनवारीयायांनी केले आहे.

# जालना जिल्ह्यात अवैध कारवायांविरोधात धडक मोहीम

### आरटीओ, उत्पादन शुल्क, महसूल व पोलिसविभागाची संयुक्त कारवाई; १०.९६ लाखांचा दंड, अवैध दारूसह ट्रॅक्टर जप्त

**जालना – प्रतिनिधी**

जिल्ह्यात कायदा वसुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतचअवैध प्रवृत्तींना

आळाघालण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागांकडूनविशेष तपासणी मोहीमराबविण्यात आली. यामोहिमेत उपप्रादेशिक परिवहनकार्यालय, राज्य उत्पादनशुल्क, महसूल वपोलिस विभागाने विविधठिकाणी कारवाई केली. वाहतूक नियमांचे उल्लंघनकरणाऱ्या वाहनांवर दंडात्मककारवाई करण्यात आली, तर अवैध दारू ववाळू वाहतुकीवरही कारवाईकरण्यात आली. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांच्याकडून वाहतूकनियमांचे उल्लंघनकरणाऱ्या वाहनांची तपासणीकरण्यात आली. १६९ वाहनांची तपासणीकरून ५९ वाहनांवरकारवाईकरण्यात आली. यामध्ये ओव्हरलोड, विनापरवाना वाहतूक, विना-, रिफ्लेक्टर नसणे, सीटबेल्ट न लावणेतसेच विना-नंबर प्लेट आदीनियमभंगाचा समावेश आहे. या कारवाईत जागेवर ५ लाख ६ हजार ५०० रुपयांचारोख दंडवसूल करण्यात आला. तसेच प्रलंबित ई-चलानपोटी ८१ हजार रुपयांचा दंडबजावण्यात आला. त्यामुळेएकूण ५लाख ८७ हजार ५०० रुपयांचादंडकरण्यात आला. तसेच राज्य उत्पादन शुल्कविभागाने अवैध दारू निर्मिती व वाहतुकीविरोधातविविध ठिकाणी छापेटाकून ९ गुन्हे दाखलकरत ९ आरोपींनाअटककेली. या कारवाईत ४६.४४लिटर अवैधदेशी दारू, ४५ लिटर हातभट्टी दारू आणि २०० लिटररसायनअसा मुद्देमाल जप्तकरण्यात आला. जप्तमुद्देमालाची एकूण किंमत ३६ हजार २०० रुपये आहे. महसूलविभागाने गौण खनिजाचेअवैध उत्खनन ववाहतूक रोखण्यासाठी तपासणीनाक्यांवर कारवाई केली.भोकरदन तालुक्यातील राजूरनाका येथे वाळूचीअवैध वाहतूक करणाराएक ट्रॅक्टर एकब्रास वाळूसह पकडण्यात आला. जिल्ह्यात शांतताव सुव्यवस्था राखण्यासाठीपोलिस विभागाकडूनही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.भारतीय नागरिक सुरक्षासंहिता कलम १२६ अन्वये ३६ जणांवर तर कलम १२९ अन्वये ७जणांवर, तर इतर कायद्यांतर्गतएका व्यक्तीवर कारवाईकरण्यात आली. एकूण ४४जणांविरुद्ध प्रतिबंधात्मकखटले दाखलकरण्यात आले. जिल्ह्यात अवैध वाहतूक, दारू विक्री तसेचइतर बेकायदेशीर कृत्यांविरोधातयापुढेही धडक कारवाईसुरू राहणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे

# तंबाखूमुक्त पिढीच्या दिशेने जालना जिल्ह्याचे दमदार पाऊल; जिल्ह्यातील १०१ शाळा तंबाखूमुक्त

**जालना – प्रतिनिधी**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम () जिल्हा रुग्णालय अंतर्गत जालना जिल्ह्यात ३९; तंबाखूमुक्त शाळा३९; अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, विद्यार्थ्यांना तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाला शाळांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आजपर्यंत जिल्ह्यातील १०१ शाळांनी तंबाखूमुक्त शाळेचे निर्धारित निकष पूर्ण केले असल्याचे जिल्हा रुग्णालय जालना यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये तंबाखूविरोधी विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये तंबाखूमुक्त शाळेसाठी निर्धारित ९ निकषांची पूर्तता करणाऱ्या शाळांचा आढावा घेऊन त्यांना तंबाखूमुक्त करण्यात येत आहे. यासाठी १० ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान प्रथम जिल्हास्तरीय सर्व तालुका शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख व विस्तारअधिकारी यांची कार्यशाळा घेण्यात आली त्यानंतर प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांची कार्यशाळा घेऊन, यामध्ये शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचा वापर व विक्री होणार नाही याची दक्षता, तंबाखूमुक्तीबाबत जनजागृती करणारे फलक, विद्यार्थ्यांना तंबाखूच्या दुष्परिणामांची माहिती, तंबाखूमुक्तीची शपथ तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचा सहभाग यासारख्या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ३९;तंबाखूला नकार, निरोगी जीवनाला स्वीकार३९; हा संदेश पोहोचविण्यात येत आहे. शाळांमध्ये तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन, जनजागृती कार्यक्रम, शपथविधी तसेच तंबाखूविरोधी संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून हा संदेश त्यांच्या कुटुंबापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावर्षी एप्रिल २०२६ ते आजपर्यंत १०१ शाळा तंबाखूमुक्त करण्यात आल्या असून हा उपक्रम येथेच थांबणार नसून पुढील काळात जिल्ह्यातील आणखी शाळांचा तंबाखूमुक्त शाळा अभियानात समावेश करण्यात येणार आहे. संबंधित शाळांना निर्धारित निकषांची पूर्तता करण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य करण्यात येणार आहे. तंबाखूचे सेवन सुरू होण्यापूर्वीच त्याला प्रतिबंध करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असून, ३९; तंबाखूमुक्त शाळा – तंबाखूमुक्त परिसर तंबाखूमुक्त पिढी३९; या संकल्पनेच्या दिशेने जालना जिल्ह्याची वाटचाल सुरू आहे.

पान १ वरुन...

### जालना जिल्ह्यात...

हेल्पलाईन कुणबी जात प्रमाणपत्रासंदर्भातील नागरिकांच्या अडचणी आणि तक्रारी सोडविण्यासाठी उपजिल्हाधिकारी शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात ०२४८२-२२३१३२ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांना या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिले. विद्यार्थी व युवकांसाठी शासनाचे विविध निर्णय शासनाने ७ सप्टेंबर रोजी मराठा-कुणबी समाजातील विद्यार्थी आणि युवकांच्या हितासाठी विविध निर्णय घेतले आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी राज्यस्तरावर २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परदेशी शिष्यवृत्तीअंतर्गत शिक्षण शुल्क थेट संबंधित विदेशी विद्यापीठांना अदा करण्यात येणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच १ ऑक्टोबरपासून मराठा-कुणबी समाजातील १ हजार ४४० युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणातून एक हजारांपेक्षा अधिक युवकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

### स्वच्छता निविदेवरून...

प्रस्तावित ४१ बसगाड्यांचा संदर्भ देत जालना शहराला किमान ४० ते ५० विद्युत बस उपलब्ध करून देण्याची मागणी महासभेत करण्यात आली. शहराची वाढती लोकसंख्या, वाढती वाहतूक आणि नागरिकांची सार्वजनिक वाहतुकीची गरज लक्षात घेऊन ई-बसमध्ये वाढ करण्यासोबतच सुमारे २० चार्जिंग केंद्रे आणि आवश्यक बसथांबे उभारण्याची मागणी करण्यात आली.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास शहरातील खासगी वाहनांची संख्या आणि वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होऊ शकते, अशी भूमिका सदस्यांनी मांडली.

चंद्रशेखर आझाद मैदान आणि कल्याणराव बोंद्रे क्रीडांगणाच्या विकासाचा प्रश्नही महासभेत मांडण्यात आला. चंद्रशेखर आझाद मैदानाची मालकी महानगरपालिकेच्या नावावर करण्याची प्रक्रिया पूर्ण करून त्याचा नियोजनबद्ध विकास करावा, अशी मागणी झाली. तरुण खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी आधुनिक क्रीडा संकुल आणि आवश्यक मूलभूत सुविधा निर्माण करण्याची गरज सदस्यांनी व्यक्त केली.

शहरातील जलवाहिन्यांच्या गळतीचा प्रश्नही चर्चेत आला. सध्या गळतीचा अंदाज घेऊन रस्ते खोदले जातात. मात्र, नेमके ठिकाण सापडले नाही तर पुन्हा खोदकाम करावे लागते. यात वेळ आणि निधी दोन्हीचा अपव्यय होत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले.

जलवाहिन्यांच्या आतील स्थिती तपासण्यासाठी मानवरहित यंत्रणा किंवा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गळतीचे अचूक ठिकाण शोधावे, अशी सूचना करण्यात आली.

यासोबतच शहरातील जलवाहिन्यांचे अद्ययावत डिजिटल नकाशे तयार करण्याची मागणी करण्यात आली. बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र गुलाबी स्वच्छतागृहे उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. धार्मिक कार्यक्रम, मेळावे आणि मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या वेळी नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करण्याची मागणीही करण्यात आली. यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीचा वापर करता येईल का, याची शक्यता तपासण्याची सूचना करण्यात आली.

सॅनिटरी पॅड, डायपर आणि अन्य स्वच्छताविषयक कचऱ्याचे संकलन आणि विल्हेवाट हा गंभीर विषय असल्याचे सदस्यांनी सांगितले. घंटागाड्यांमध्ये अशा कचऱ्यासाठी स्वतंत्र पेट्या बसवून त्याचे स्वतंत्र संकलन, वाहतूक आणि सुरक्षित विल्हेवाट करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली. प्रभाग क्रमांक सहामधील मुख्य बाजारपेठेत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहने उभी राहत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचा मुद्दा पुन्हा उपस्थित झाला.

महानगरपालिकेने पार्किंगसाठी आरक्षित केलेल्या जागांची संख्या, क्षेत्रफळ, ठिकाण आणि सद्यस्थिती याची माहिती लेखी स्वरूपात देण्याची मागणी करण्यात आली. काही प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले.

नेहरू रोडच्या मागील बाजूस किल्लेदार ज्वेलर्स परिसरातील रस्त्याचा प्रश्नही सभेत उपस्थित झाला. या मार्गावर कचरा टाकला जात असल्याने तो काही काळ बंद झाल्याचे सांगण्यात आले. सध्या स्वच्छता करण्यात आली असून भूमिगत निचरा आणि रस्त्याचे काम पूर्ण करून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी करण्यात आली. हा मार्ग सुरू झाल्यास नेहरू रोडवरील वाहतुकीचा काही भार कमी होण्याची शक्यता सदस्यांनी व्यक्त केली. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता चंदनझिरा आणि नागेवाडी परिसरासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उभारण्याची मागणी करण्यात आली. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये रंगरंगोटी, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य आणि अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी सामाजिक संस्थांचा सहभाग घेण्याची सूचना करण्यात आली.

लायन्स क्लबच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व निधीतून एका मनपा शाळेचा विकास करण्याची तयारी व्यक्त करण्यात आली. महानगरपालिकेने गरज असलेली शाळा निश्चित करून द्यावी, अशी भूमिका मांडण्यात आली.

महानगरपालिकेच्या माध्यमातून सुमारे १३५ कोटी रुपयांची विकासकामे झाल्याचा संदर्भ देत या कामांचे नकाशे आणि संबंधित कागदपत्रे सदस्यांना उपलब्ध होत नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. विकासकामांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी कामांचे नकाशे, अंदाजपत्रके आणि संबंधित माहिती सदस्यांना उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. शहरातील आठ ते दहा प्रमुख नाले अतिक्रमणामुळे अरुंद झाल्याचा दावा सदस्यांनी केला. काही ठिकाणी नाल्यांवर बांधकामे झाल्याने साफसफाईसाठी यंत्रसामग्री पोहोचविणेही अवघड होत असल्याचे सांगण्यात आले. भरतनगरसह विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करून नाल्यांवरील अतिक्रमणे निश्चित करावीत आणि नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

दरवर्षी नालेसफाईवर खर्च होत असतानाही पावसाळ्यात पुन्हा पाणी साचण्याची परिस्थिती निर्माण का होते, असा सवाल सदस्यांनी उपस्थित केला.

नालेसफाईची प्रत्यक्ष पाहणी, कामाचा दर्जा, खर्च आणि केलेल्या कामाचे परिणाम यांचा स्वतंत्र आढावा घेण्याची मागणी करण्यात आली. डासांचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन प्रभागनिहाय औषध फवारणी करण्याची मागणी करण्यात आली. नाले, गटारे आणि अस्वच्छ परिसरात नियमित स्वच्छता करून डास नियंत्रणाची प्रभावी मोहीम राबविण्याची सूचना करण्यात आली. महासभेत सर्वाधिक गंभीर बाबींपैकी एक म्हणजे महानगरपालिका इमारतीची अद्याप अग्निसुरक्षा तपासणी झालेली नसल्याची माहिती समोर आली.

दररोज नागरिक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने ये-जा करीत असलेल्या इमारतीची अग्निसुरक्षा तपासणी झाली आहे का, असा प्रश्न सदस्यांनी विचारला. त्यावर अद्याप तपासणी झालेली नसल्याचे प्रशासनाने मान्य केले.

तातडीने अग्निसुरक्षा तपासणी करून आवश्यक त्रुटी दूर कराव्यात आणि त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली.

नव्याने बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यांमध्ये वाहतुकीस अडथळा ठरणारे विद्युत खांब असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. काही ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी किंवा वाहतुकीच्या मार्गात खांब असल्याने अपघाताचा धोका निर्माण होत असल्याचे सदस्यांनी सांगितले. महावितरणशी समन्वय साधून हे खांब तातडीने हटविण्याची मागणी करण्यात आली. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्तींचे आगमन आणि विसर्जन मिरवणुकीचे मार्ग तपासून खड्डे बुजविणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याची मागणी करण्यात आली.

महानगरपालिकेच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करत जगदीश भारतीया यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली. ''महानगरपालिकेचा इतिहास तयार करा; एका वर्षात एकही काम झाले नाही,'' अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

मंजूर कामे वेळेत पूर्ण होत नसतील आणि सभागृहात वारंवार प्रश्न उपस्थित करूनही त्यावर कार्यवाही होत नसेल तर नागरिकांच्या समस्या सुटणार कशा, असा सवाल त्यांनी केला. स्व. चंपालाल भागवत यांना महासभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी शहरात त्यांच्या नावाने कमान उभारण्याची मागणी अक्षय गोरंट्याल आणि विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांनी केली. त्यांच्या नावाने चौक किंवा रस्त्याचे नामकरण करण्याची मागणीही करण्यात आली. कमान उभारण्याच्या प्रस्तावाला सभागृहाने मंजुरी दिली. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मंजूर कारंजे अद्याप सुरू न झाल्याबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. मंजूर कामांना प्रत्यक्ष स्वरूप देण्यास विलंब का होत आहे, असा सवाल करत कारंजे तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. महानगरपालिकेकडे निधीची कमतरता असल्याने काही विकासकामे रखडल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. उपलब्ध निधीच्या आधारे प्राधान्यक्रम ठरवून नागरिकांच्या दृष्टीने अत्यावश्यक कामांना प्रथम गती देण्याची मागणी सदस्यांनी केली.

गुरुवारच्या महासभेत स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, नाले, पार्किंग, सार्वजनिक वाहतूक, क्रीडा सुविधा, स्वच्छतागृहे, सॅनिटरी कचरा, स्मशानभूमी, मनपा शाळा, अग्निसुरक्षा, विद्युत खांब आणि विकासकामांची पारदर्शकता अशा जवळपास प्रत्येक मूलभूत प्रश्नावर चर्चा झाली. मात्र, या सर्व प्रश्नांमध्ये १५ कोटींची स्वच्छता निविदा हा महासभेचा सर्वाधिक तापलेला विषय ठरला. एक वर्षापासून निविदा रखडलेली असताना सहा वेळा सुधारणा, चार निविदाधारक, हजारो कागदपत्रांची छाननी, अधिकाऱ्यांमधील आरोप-प्रत्यारोप आणि अखेरीस लेखाधिकारी यांच्या निलंबनाचा ठरावया संपूर्ण प्रक्रियेमुळे प्रशासनातील कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता प्रशासनाला दोन दिवसांची स्पष्ट मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे दोन दिवसांत निविदा प्रक्रिया पूर्ण होते का, त्यानंतर प्रत्यक्ष स्वच्छता काम कधी सुरू होते आणि शहरातील कचऱ्याचे ढीग व अस्वच्छता कधी कमी होते, हे तीन प्रश्न जालनाकरांसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

कागदपत्रांची छाननी, बैठका आणि ठरावांच्या पलीकडे जाऊन शहराच्या रस्त्यावर स्वच्छता दिसली, नागरिकांच्या तक्रारी कमी झाल्या आणि मूलभूत सुविधा प्रत्यक्ष सुधारल्या, तरच महासभेतील निर्णयांचा खरा अर्थ सिद्ध होणार आहे. दोन दिवसांची मुदत प्रशासनाला मिळाली आहे; आता नागरिकांच्या नजरा घड्याळाकडे नाही, तर प्रत्यक्ष कामाकडे लागल्या आहेत.

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्राह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले.

तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले.

त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# एकीकडे गणेशोत्सवात पथकर सवलत, तर दुसरीकडे खाजगी बस प्रवासी वाऱ्यावर!

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी पथकर (टोल) सवलत लागू केली आहे. परंतु, शासनाकडून एकीकडे टोल सवलतीची घोषणा होत असताना, दुसरीकडे मात्र खाजगी बसेसने प्रवास करणाऱ्या हजारो चाकरमान्यांना प्रशासनाने पूर्णपणे वाऱ्यावर सोडल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. सुराज्य अभियानाने यापूर्वीही अनेकदा विविध माध्यमांतून प्रशासनाचे लक्ष वेधून कडक कारवाईची मागणी केली होती; मात्र प्रशासकीय दुर्लक्षामुळे आज ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या सर्व नियमित व विशेष रेल्वे गाड्यांचे आरक्षण महिनाभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. तसेच एसटी महामंडळाच्या बसेसची संख्या व प्रवासी क्षमता मर्यादित असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रवाशांना नाईलाजाने खाजगी कंत्राटी बसेसचा पर्याय निवडावा लागत आहे. याच परिस्थितीचा थेट गैरफायदा ऑनलाइन बस तिकीट बुकिंग एपच्या माध्यमातून खाजगी ट्रॅव्हल्स घेत असून ४००% ते १२००% पर्यंत बेकायदेशीर भाडेवाढ करत आहेत. रेड बस तिकीट बुकिंग पोर्टल वर मुंबई, पुणे आणि कोल्हापूरवरून कोकणात जाणाऱ्या सर्वच प्रमुख मार्गांवर रु. १,२०० ते रु. ३,९५७ पर्यंतची बेकायदेशीर दरवाढ दिसत आहे :




पुणे ते कणकवली मार्ग: १० सप्टेंबरचे भाडे रु. २,२१७ ते रु. २,५९९ - गणेशोत्सव आगमनाच्या दिवशी (११ सप्टें) ते थेट रु. ३,४०० ते रु. ४,४२१ पर्यंत (रु. १,८०० ची वाढ) वाढवण्यात आले आहे.
मुंबई (सायन) ते सिंधुदुर्ग मार्ग: ९ सप्टेंबरचे मूळ भाडे रु. १,१०० असताना, ११ सप्टेंबर रोजी रु. ४,२७६ आकारले जात आहे (रु. ३,१७६ ची थेट वाढ). कोल्हापूर ते कांकवली मार्ग: ९ सप्टेंबरचे मूळ भाडे रु. ३६० वरून ११ सप्टेंबरसाठी थेट रु. ४,३१७ प्रति सीट (रु. ३,९५७ ची प्रचंड वाढ) आकारले जात आहे. मोटार वाहन कायदा (कलम ६७) नुसार खाजगी बसेसचे कमाल भाडे एसटीच्या मूळ भाड्याच्या १.५ पट (५०% अधिक) असणे बंधनकारक असताना ऑनलाइन मात्र अवाढव्य दराने तिकीट विक्री सुरू आहे. यासाठी परिवहन विभागाने कलम ९३ अन्वये ऑनलाईन ॲप्सवर १.५ पट मर्यादेचे डिजिटल फेयर लॉक लावावे, प्रत्येक बसमध्ये सीटच्या मागे तक्रार निवारण कोड अनिवार्य करावा तसेच सर्व ऑनलाइन बूकिंग पोर्टलची तपासणीसह आरटीओच्या फ्लाईंग स्क्वॉडद्वारे अचानक तपासणी करून जादा भाडे वसूल करणाऱ्या बसेसचे परवाने तात्काळ निलंबित करावेत.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांनुसार जालना महसूल पथकाची कारवाई

### गोलापांगरी येथे २५ ब्रास बेकायदेशीर वाळू साठा जप्त

**जालना - प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी जालना व पोलीस अधिक्षक जालना यांच्या समन्वयाने महसूल व पोलीस प्रशासनाने अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी विशेष धडक मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी जालना व पोलीस अधिक्षक जालना यांचे मार्गदशनाखाली राजू निहाळ नायब तहसिलदार व इतर कर्मचारी तसेच पोलीस निरिक्षक श्री. खामगळ, यांच्या संयुक्त पथकाने दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास गोलापांगरी परिसरात अचानक पाहणी व तपासणी मोहीम राबवली. या तपासणीदरम्यान मौजे गोलापांगरी येथे अंदाजे २५ ब्रासचा मोठा अवैध वाळू साठा आढळून आला. महसूल पथकाने तांतडीने कारवाई करत हा संपूर्ण वाळू साठा जप्त केला आहे. जप्त केलेला वाळू साठा पुढील योग्य व्यवस्थेसाठी आणि संरक्षणासाठी संबंधित सजाच्या तलाठ्यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. अवैध वाळू साठा करणाऱ्या व उत्खननात सहभागी असलेल्या संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया महसूल विभागाकडून सुरू आहे. जिल्ह्यात यापुढेही अशा प्रकारे बेकायदेशीर वाळू उत्खनन किंवा वाहतूक आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

## महाराष्ट्र सोडले, मोबाईल बंद तरीही सागर शिंदे याच्या नजरेतून आरोपी सुटला नाही

### ऊसाच्या शेतात ३ किलोमीटर 'थरारक' पाठलाग; भोकरदन पोलिसांनी तमिळनाडूतून फरार आरोपीला पकडले

भोकरदन (प्रतिनिधी) : गुन्हा दाखल झाल्यानंतर तब्बल महिनाभर मोबाईल बंद करून महाराष्ट्राबाहेर फरार झालेल्या आरोपीचा भोकरदन पोलिसांनी थेट तमिळनाडूत शोध घेतला. कडाथुर परिसरातील ऊसाच्या शेतात पोलिसांना पाहताच आरोपीने धूम ठोकली; मात्र पोलिसांनी तब्बल तीन किलोमीटरपर्यंत शेतातून पाठलाग करत त्याला अखेर शिताफीने ताब्यात घेतले. या कारवाईमुळे भोकरदन पोलिसांच्या तपास पथकाचे कौतुक होत आहे.पोलीस ठाणे भोकरदन येथे गु.र.नं. ४६०/२०२६ अन्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल आहे. या प्रकरणातील आरोपी सोमीनाथ लक्ष्मण गायकवाड (रा. नळणी बु., ता. भोकरदन, जि. जालना) हा मागील सुमारे महिनाभरापासून



मोबाईल बंद करून महाराष्ट्राबाहेर फरार होता.आरोपीच्या शोधासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे, पोलीस अंमलदार योगेश गवळी आणि गृहरक्षक दलाचे कर्मचारी साजीद शेख यांचे विशेष तपास पथक तयार करण्यात आले.आरोपी तमिळनाडूत असल्याची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठांची लेखी परवानगी घेऊन पथक तमिळनाडूकडे रवाना झाले.गोपनीय माहिती, तांत्रिक माहितीचे विश्लेषण आणि दुभाषिकाच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली.अखेर आरोपी कडाथुर, ता. नंबियुर, जि. इरोडे परिसरात असल्याची विश्वसनीय माहिती पोलिसांना मिळाली.पथकाने परिसरात शोधमोहीम राबवली असता आरोपीची चाहूल लागताच पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहताच आरोपीने ऊसाच्या शेतातून पळ काढला. त्यानंतर पोलिसांनीही हार न मानता शेतातून तब्बल तीन किलोमीटर पाठलाग केला आणि अखेर आरोपीला ताब्यात घेतले.त्यानंतर आरोपीला तमिळनाडूतील संबंधित न्यायालयासमोर हजर करून रिमांड घेण्यात आला असून, तपास पथक आरोपीसह भोकरदनकडे परत येत आहे.

## रत्नागिरी जिल्हा ओबीसी जनमोर्चा महासचिव पदी रघुवीर शेलार यांची निवड

**राजापूर - प्रतिनिधी.**

रत्नागिरी जिल्हा ओबीसी जनमोर्चा समन्वय समितीची सभा सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी रत्नागिरी येथील जे के फाईल्स स्टॉप जवळील कुणबी भवन येथे ओबीसी जनमोर्चा आणि ओबीसी समन्वय संघर्ष समितीच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.ओबीसी जनमोर्चा जिल्हा अध्यक्ष शरदचंद्र गीते, प्रकाश मांडवकर, सहदेव बेटकर, रामभाऊ गराटे, रघुवीर शेलार, दिपक राऊत आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.रघुवीर शेलार रत्नागिरी जिल्हा तेली समाज संघाचे अध्यक्ष आहेत.त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील



प्रत्येक तालुक्यात तेली समाज संघटना स्थापन करण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे.तेली समाज समाज ओबीसी जनमोर्चा संघटनेचा सदस्य आहे.रघवीर शेलार यांचे कर्तृत्व, वकृत्व, संघटना बांधणी कौशल्य उत्तम आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना, सहकारी पतसंस्था, व्यवसाय मार्गदर्शन - प्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे.ओबीसी जनमोर्चा समन्वय समितीचे कार्य उत्तम करीत आहेत.यास्तव, रत्नागिरी जिल्हा ओबीसी जनमोर्चा समन्वय समितीच्या अध्यक्षांनी त्यांची नेमणूक रत्नागिरी जिल्हा ओबीसी जनमोर्चा समन्वय समितीच्या महासचिव पदी निवड केली आहे.शेलार यांच्या निवडीने त्यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.रत्नागिरी जिल्हा तेली समाज सेवा संघाच्या प्रत्येक तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी शेलार यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

**महादेव गोळवसकर**

# मारबत उत्सव- आपली विडंबना दडपण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न

प्रत्येक सणाची काही ना काही आख्यायिका असते आणि त्यातून विशिष्ट समुदायाला अथवा विशिष्ट शहराला एक अद्भूत ओळख मिळालेली असते. अशीच काहीशी ओळख मारबत उत्सवापासून नागपूरला मिळालेली आहे. नागपूरचा मारबत उत्सव हा महाराष्ट्रातील विदर्भ भागात पोळ्याच्या दुस-या दिवशी म्हणजेच तान्हा पोळ्याच्या दिवशी साजरा केला जाणारा एक अद्वितीय आणि ऐतिहासिक उत्सव आहे. ही सुमारे १४० ते १४४ वर्षे जुनी परंपरा आहे, जी प्रामुख्याने नागपूरातच साजरी केली जाते. याची सुरुवात १८८१-१८८५ च्या सुमारास त-हाणे तेली समाजाने केली. या उत्सवात पिवळी व काळी मारबत यांचे मोठे पुतळे तयार करून त्यांची मिरवणूक काढली जाते. कृष्णाला मारण्यासाठी आलेल्या पुतना मावशीचे प्रतीक म्हणून काळी मारबत तर लोकांचे रक्षण करणा-या शक्तीचे प्रतीक म्हणून पिवळी मारबत मानली जाते. समाजातील वाईट चालीरीती, अंधश्रद्धा, रोगराई, महागाई आणि अनिष्ट प्रवृत्ती दूर जाव्यात यासाठी ''इडा-पीडा घेऊन जा गे मारबत'' असा नारा देत हा उत्सव साजरा होतो. एकूणच इडा-पीडाचे निरोपण होते. मारबतीच्या बरोबरीने चालू घडामोडी, राजकीय विडंबन आणि सामाजिक समस्यांवर भाष्य करणारे बडग्या नावाचे पुतळेही मिरवणुकीत रांगेत फिरवले जातात आणि शेवटी त्यांचे दहन केले जाते.

रसाळ संत्री, झिरो माईल, दीक्षाभूमी आणि वाघ अशी शहराची ओळख सांगणारी अनेक वैशिष्ट्ये डोळ्यासमोर येतात. मात्र नागपूरच्या सांस्कृतिक ओळखीचा अनोखा भाग म्हणजे मारबत-बडग्यांची मिरवणूक. धार्मिक आणि सांस्कृतिक मिरवणुका देशभरात पाहायला मिळतात. मात्र वाईट प्रवृत्ती, सामाजिक अनिष्ट रूढी-परंपरा तसेच ब्रिटिश सत्तेविरोधातील भावना प्रतीकात्मक पद्धतीनं व्यक्त करणारा मारबत उत्सव नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात विशेष स्थान राखतो. राज्यविकास पर्यटन मंडळाने मान्यता दिलेल्या नागपूर शहराने वर्षानुवर्षे मारबत मिरवण्याची परंपरा जपली आहे आणि त्यामुळे संपूर्ण देशातील मारबत मिरवणुकीच्या वेगळेपणासाठी नागपूर हे शहर ओळखले जाते. मारबत उत्सव म्हणजे नागपूर शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा. नागपूरमध्ये दरवर्षी बैल पोळ्याच्या दुस-या दिवशी पिवळी व काळी मारबत तसेच बडग्याची भव्य मिरवणूक धूमधडाक्यात काढली जाते. काळ्या मारबतीची सुरुवात १८८० मध्ये, तर पिवळ्या मारबतीची सुरुवात १८८४ मध्ये झाली होती. देशविदेशात चर्चा व वेगळी ओळख मिळालेल्या या उत्सवाला जवळपास १४० वर्षांची परंपरा लाभली आहे. संपूर्ण देशात हा उत्सव फक्त नागपूरातच साजरा केला जातो. कोरोना अपवाद वगळता यात कधीच खंड पडला नाही. १८९७ मधील अगदी प्लेगची साथ आणि १९२७ मध्ये दंगे सुरु असतानाही हा उत्सव कुठल्याही अडथळ्याविना पार पाडल्या गेला. या अभिनव प्रथेच्या माध्यमातून वर्षभर देशात घडलेल्या चांगल्या-वाईट घटनांवर भाष्य करणारे बडगे (मोठे पुतळे) तयार केले जातात. या वैशिष्ट्यांमुळे शहरातीलच नव्हे तर आजूबाजूच्या राज्यांमधून लाखो नागरिक मारबत मिरवणूक बघण्यासाठी आवर्जून येत असतात आणि या उत्सवाचा आनंद घेतात. पिवळ्या मारबतीसोबतच काळ्या मारबतीलाही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. श्री देवस्थान पंच कमिटीतर्फे गेल्या १३५ वर्षांपासून इतवारीस्थित नेहरू पुतळ्यापासून काळ्या मारबतीची मिरवणूक काढली जाते. सगळ्यात पूर्वी अप्पाजी मराठे काळ्या मारबतीचा उत्सव साजरा करत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर इंग्राजांचं राज्य होतं. त्यांच्याकडून होत असलेल्या जुलमी कारनाम्यांनी जनता त्रस्त होती. त्यावेळी नागपूरच्या राजघराण्यातील भोसले राजा यांची बहीण बाकाबाईने इंग्रजांशी हातमिळणी केली होती. त्याचा निषेध करण्यासाठी १८८१ पासून काळी मारबत मिरवणूक काढण्यात येत आहे. बाकाबाईच्या नव-यानेपण या तिच्या कृत्याचा विरोध केला नाही. म्हणून त्याचाही पुतळा बनवून सोबतच त्याचीपण मिरवणूक काढतात. इंग्रजांचे राज्य जाऊन आज कितीतरी वर्षे लोटली. परंतु, नागपूरकर आणि या परीसरातील नागरिकांच्या मनात बाकाबाईच्या कुकृत्यामुळे झालेली जखम अजून भळभळतेच आहे. नेहरू पुतळ्याजवळील हनुमान मंदिरात ही काळी मारबत आहे. ब्रिटीश राजवटीत लोक अत्याचाराने त्रस्त होते. परकीय गुलामगिरीचे पाश तुटून देश स्वतंत्र व्हावा, या भावनेने १८८५ मध्ये जागनाथ बुधवारी परिसरात त-हाणे तेली समाजबांधवांनी पिवळी मारबत उत्सव कमिटीची स्थापना केली. ती परंपरा आजही सुरु आहे. या परंपरेला नागपूर शहरात विशेष महत्त्व आहे. पोळ्याच्या दुस-या दिवशी अर्थात तान्हा पोळ्याच्या दिवशी नागपूरात काळी आणि पिवळी मारबत तसेच सामाजिक व राजकीय मुद्द्यांवर भाष्य करणा-या बडग्याची मिरवणूक काढली जाते. देशात फक्त नागपूरातच ही परंपरा असून दरवर्षी नागपूरकर उत्साहात या मिरवणुकीत भाग घेऊन आनंदोत्सव साजरा करतात. काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीकडूनच मिरवणुकीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मात्र यावर्षी प्रथमतः महापालिकेतील सत्ताधारी भाजपने तो साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे मारबत उत्सव आयोजक समितीकडून 'हायजॅक' करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' असा जयघोष करीत तरुण या मारबत मिरवणुकीत सामील होतात. स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्द्यांकडे लक्ष वेधणारे बडगेही या मिरवणुकीत सामील केले जातात. अर्थात अनेक बडगे हे राज्य किंवा केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध असतात. अशावेळी सरकारच्या नावानेही या मिरवणुकीत बोंब ठोकली जाते. सरकारविरोधात एका दिवसासाठी दिलेल्या घोषणांमुळे सत्ताधा-यांविरोधात वातावरण तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिकेतील भाजप सत्ताधा-यांनी या महोत्सवासाठी प्रथमच अर्थसंकल्पात तरतूद केल्याने आताच या महोत्सवाला महापालिकेने हातात का घेतले? अशी चर्चा रंगली आहे. मारबत मिरवणुकीत ८० टक्के तरुणांचा समावेश असतो. नुकताच जंतर-मंतरवरील आंदोलनातून तरुण दूर जात असल्याचे भाजपच्या लक्षात आल्याचे केंद्र सरकारने घेतलेल्या एक विद्यापीठ एक मंत्री संवादाच्या निर्णयातून दिसून येत आहे. त्यामुळे तरुणापर्यंत पोहोचण्यासाठी मारबत महोत्सव उत्तम संधी असल्याने भाजप सत्तेत असलेल्या महापालिकेने हा उत्सव हातात घेतल्याचीही चर्चा यानिमित्त रंगली आहे. सत्ताधा-यांच्या या प्रयत्नातून तरुण भाजपच्या गळाला लागणार काय, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. आतापर्यंत काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीचे पदाधिकारी व्यापारी वर्गाकडून वर्गणी गोळा करून देखणी व आकर्षक मिरवणूक काढत होती. एका लाखापेक्षा जास्त नागरिक यात सहभागी होत असल्याने महापालिकेची भूमिका मिरवणूक गेल्यानंतर रस्ते स्वच्छ करण्याची होती. परंतु यंदा महापौर नीता ठाकरे यांच्या नेतृत्वात सध्या महापालिकेकडून मारबत महोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे. महापालिकेच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांनी अर्थसंकल्पात या महोत्सवासाठी २ कोटींची तरतूद केली आहे. हा नागरिकांचा उत्सव असल्याने यात नागरिकांच्या सहभागासाठी महापालिकेला प्रयत्न करावे लागणार नाही. परंतु महापालिकेने या महोत्सवासाठी केंद्रातील मंत्री, देशातील व्यक्तिविशेषच नव्हे तर परदेशातील भारतीयांनाही बोलावण्याचा निर्धार केला असून निमंत्रण दिले जात आहे. आता या महोत्सवाच्या निमंत्रणाला केंद्रीय स्तरावरील नेते, परदेशी पाहुणे किती प्रतिसाद देतात, यावर महापालिकेचे यश अवलंबून राहणार असल्याचे उत्सव समितीतील काहींनी नमूद केले. त्यामुळे महापालिकेला या डावपेचात यश मिळेल का याकडे डोळस नजरेने पाहिल्या जाईल. १४५ वर्षांची परंपरा असलेल्या मारबत महोत्सवाला प्रथमच महापालिकेने आपल्या हातात घेतले. परंतु यापूर्वी असा प्रयत्न महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) ने २०१३-१४ मध्ये महोत्सवाला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली होती. नागपूरची ही अनोखी संस्कृती देशातील व जगातील पर्यटकांपर्यंत पोहोचावी यासाठी महामंडळाने मारबत महोत्सवाला पर्यटनाच्या नकाशावर स्थान दिले होते. एमटीडीसीने त्यावेळी शहरात केवळ काही बॅनर लावले. मारबत निघते त्या भागात एक मंडप टाकला. एवढाच तोंडदिखाऊपणा एमटीडीसीने त्यावेळी केला. त्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली. मुळात मारबत महोत्सव समितीला महामंडळाचा काहीही फायदा झाला नाही. त्यानंतर एमटीडीसीने मारबत महोत्सवाचे कधीही नाव काढले नाही. समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याच्या उद्देशाने बैल पोळ्याच्या दुस-या दिवशी मारबत मिरवणूक काढण्यात येते. कृष्णाला मारण्यासाठी आलेली पुतना मावशीचे प्रतीक म्हणून काळी मारबत, तर पिवळी मारबत लोकांचे रक्षण करते, अशी आख्यायिका आहे. १८८५ मध्ये तराणे तेली समाजाच्या लोकांनी जागनाथ बुधवारी परिसरात पिवळी मारबत उत्सव समितीची स्थापना करून इंग्रजांच्या दडपशाही आणि अत्याचाराविरुद्ध पिवळी चळवळ सुरु केली. आता मात्र समाजातील सर्व संकटे, रोगराई आणि वाईट प्रवृत्ती दूर पळाव्यात व चांगल्या विचारांचे स्वागत व्हावे यासाठी मारबतीची मिरवणूक काढली जाते. बडग्या हा दरवर्षीच्या चालू घडामोडी, महागाई, भ्रष्टाचार किंवा सामाजिक वाईट प्रवृत्तींचे प्रतीक म्हणून तयार केला जातो. त्याला समाजसुधारणेचे व राजकीय विडंबनाच्या फलकाची जोड असते. परंपरेनुसार माझे मारबताकडे एवढेच साकडे आहे की, जे नालायक आणि केवळ आपलाच स्वार्थ पाहणारे मंत्री, खासदार, आमदार, अधिकारी, कर्मचारी आणि गाव पातळीवरील लायकी नसलेले, आपलाच फायदा साध्य करणारे आणि लिडरगिरी दाखविणा-या लिडर्सना मारबत घेऊन जावे. बाय चॉन्स त्यांच्या आधी मीच गेलो, तर त्यांच्या उरावर बसल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र निश्चित..!

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

# परतूर उपविभागात कुणबी जात प्रमाणपत्र मोहिमेला वेग

## १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक मंडळ स्तरावर विशेष जनजागृती व अर्ज स्वीकृती शिबिरे

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर उपविभागातील पात्र नागरिकांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान व्हावी, यासाठी महसूल प्रशासनाच्या वतीने १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक मंडळ स्तरावर विशेष जनजागृती आणि अर्ज स्वीकार शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा लाभ जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन परतूर उपविभागीय अधिकारी श्री. पद्माकर गायकवाड (एसडीओ) यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, २४ ऑक्टोबर २०२३ पासून परतूर व मंठा तालुक्यातील कुणबी नोंदी व संबंधित अभिलेखांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेण्यात आली होती. आतापर्यंत परतूर उपविभागात तब्बल १,७८,७८७ नोंदींची तपासणी पूर्ण झाली असून, त्यामध्ये ९२८ कुणबी नोंदी आढळून आल्या आहेत. या नोंदी एकूण १९ गावांमध्ये आढळल्या असून सर्व याद्या संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये नागरिकांच्या माहितीसाठी डकवून प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

या कालावधीत प्राप्त झालेल्या सर्वच्या सर्व ४,४८२ अर्जांवर प्रक्रिया पूर्ण करून जात प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत. तसेच २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार, हैदराबाद गॅझेटिअरमधील




नोंदींचा विचार करून प्राप्त झालेल्या सर्व १६५ अर्जांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. याशिवाय, मार्च २०२४ पासून आजतागायत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग () प्रवर्गातील ५,२१९ जात प्रमाणपत्रे पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली आहेत.

असे असेल शिबिरांचे वेळापत्रक: दि. १० सप्टेंबर २०२६:- आष्टी (महसूल मंडळ कार्यालय, आष्टी) व तळणी (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) ११ सप्टें. - श्रीष्टी (ग्रामपंचायत कार्यालय, श्रीष्टी) व मंठा (तहसील कार्यालय, मंठा) १२ सप्टें. - वाटूर (ग्रामपंचायत कार्यालय, वाटूर) व पांगरी गोसावी (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) १५ सप्टें - सातोना खु. (महसूल मंडळ कार्यालय), कोकाटे हदगाव (ग्रामपंचायत कार्यालय) व ढोकसाळ (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय)

१६ सप्टें - परतूर (तहसील कार्यालय, परतूर) व माळतोंडी (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय) १७ सप्टें - जयपूर (संबंधित ग्रामपंचायत कार्यालय)

आयोजित शिबिरांमध्ये कुणबी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, अर्ज भरण्याची प्रत्यक्ष पद्धत, आवश्यक पात्रता निकष आणि शासन निर्णयातील तरतुदींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच पात्र नागरिकांकडून आवश्यक संचिका (फाईल) व अर्ज जागेवरच स्वीकारण्याची सोय प्रशासनाने उपलब्ध करून दिली आहे. या विशेष जनजागृती मोहिमेमुळे तळागाळातील पात्र नागरिकांपर्यंत अचूक माहिती पोहोचून अर्जांच्या संख्येत वाढ होईल आणि प्रमाणपत्रांची प्रक्रिया अधिक पारदर्शक व जलद होईल, असा विश्वास उपविभागीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला असून नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरांना उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. गायकवाड यांनी केले आहे.

# शिवमुद्रा प्रतिष्ठानच्या दहीहंडी सोहळ्यात जल्लोष

## प्रतिष्ठानचे संस्थापक उदयसिंह बोराडे यांच्या पुढाकाराला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**मंठा - प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शिवमुद्रा प्रतिष्ठान आयोजित व शिवसेना पुरस्कृत भव्य दहीहंडी सोहळा उत्साहात व जल्लोषात शहरातील राऊत मैदान येथे संपन्न झाला. शिवमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक, शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक उदयसिंह बोराडे यांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्याला मंठापरतूर तसेच नेरसेवली भागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे, उद्योग आघाडी जिल्हाप्रमुख प्रल्हादरावजी बोराडे, उपजिल्हाप्रमुख किसनरावजी मोरे, नगरसेवक प्रदीप भाऊ बोराडे, तुळशीरामजी कुहिरे, विष्णुपंत चव्हाण, योगेश अवचार यांची प्रमुख उपस्थिती लाभली या सोहळ्यात अभिनेत्री मानसी पाटील यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाचे आकर्षण वाढले. गोविंदा पथकांनी सादर केलेल्या थरारक दहीहंडीने उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला.मंठापरतूर, नेरसेवली भागातील दहीहंडीप्रेमी नागरिक, गोविंदा पथके, शिवमुद्रा प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले. "दहीहंडी हा केवळ उत्सव नसून एकजुटीचा आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव आहे," या भावनेतून उदयसिंह बोराडे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने मंठा नगरीत उत्साहाचे वातावरण निर्माण केले. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शिवमुद्रा प्रतिष्ठानचे सर्व सहकारी, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, गोविंदा पथके आणि कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या नागरिकांचे बोराडे यांनी आभार मानले.

# पोळा सणाच्या दिवशी शेतकऱ्यांनी बैल एकत्रित आणून शासन विरोधात कोरडा दुष्काळ जाहीर करावा

**परतूर - प्रतिनिधी**

आज पोळा सणाच्या निमित्ताने सोयंजना शेरोडा येथील शेतकरी बांधव एकत्रित येत सोयंजना शेरोडा हातडी रोड वरती गावातील शेतकऱ्यांनी बैल एकत्रित आणून शासनाच्या विरोधात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा. तसेच पीक कर्जमाफीची तात्काळ दुसरी यादी जाहीर करावी. या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. परतूर तालुक्यात यावर्षी पावसाचे प्रमाण अल्प झाल्यामुळे अनेक भागात पिकांची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला




केलेली आहे परंतु पहिली यादी जाहीर झालेली आहे दुसरी यादी तातकाळ कर्जमाफीची जाहीर करण्यात आहे. त्यामुळे परतूर तालुका सरसकट कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी कोरडवाहू शेतकऱ्याला प्रति हेक्टरी ५० हजार रु आणि बागायतदार शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावी पिक विमा तात्काळ शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग करण्यात यावा. शासनाने कर्जमाफी ही जाहीर यावी या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. आंदोलनाच्या माध्यमातून शासनाने शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीकडे बैलाच्या पाठीवर चित्र कोरडा दुष्काळ तात्काळ जाहीर करा अशा आशयाचे चित्र काढून संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. व दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# जालन्याचा झेंडा जगाच्या शिखरावर!

## ६७ वर्षीय प्राचार्य जवाहर काबरा यांनी रचला उमलिंगला पासवर सायकलिंगचा वर्ल्ड रेकॉर्ड

**जालना - प्रतिनिधी**

इच्छाशक्ती आणि जिद्द अथांग असेल तर वय हा केवळ एक आकडा ठरतो, हे जालन्याचे सुपूत्र आणि निवृत्त प्राचार्य जवाहर काबरा यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. श्वास घेणेही कठीण असलेल्या तब्बल १९ हजार २४ फूट उंचीवरील जगातील सर्वोच्च वाहनयोग्य अशा उमलिंगला पासवर त्यांनी सायकलने यशस्वीत्याच्या धडक मारली आहे. सर्वाधिक वयात या थरारक कामगिरीची 'वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडिया' आणि 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद झाली असून, या अद्भूत पराक्रमामुळे जागतिक विक्रम रचणारे ते जालना जिल्ह्यातील पहिले व्यक्ती ठरले आहेत. यूथ हॉस्टल्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने २० ते ३१ जुलैदरम्यान लेह-उमलिंगला सायकल मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत प्रतिकूल हवामान, ऑक्सिजनची तीव्र कमतरता, हाडे गोठवणारी थंडी आणि खडतर चढण अशा सर्व आव्हानांवर मात करत प्राचार्य काबरा यांनी पॅडल मारत उमलिंगला पासचे शिखर गाठले. त्यांच्या या ऐतिहासिक यशाने केवळ जालन्याचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर अभिमानाने उंचावले आहे. या अविस्मरणीय कामगिरीबद्दल प्राचार्य जवाहर काबरा यांचा विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये एसआरपीएफ कमांडंट संजय बारकुंड, उपमहापौर राजेश राऊत, माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, माहेश्वरी समाजाचे प्रदेश कोषाध्यक्ष संजय दाड, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश अग्निहोत्री, टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष विनोद लाहोटी, सतीश सेठिया आणि जालन्याचे पहिले 'आयरन मॅन' कैलास झोळगे, पवन जोशी, संतोष गंडाळ, प्रवीण बाफना, फुलचंद मोहिते, पंडित सुरूशे आदींचा समावेश आहे. तसेच जालना सायकलिस्ट ग्रुप, डॉल्फिन ग्रुप, रेग्युलर स्विमर्स, जालना रनर्स, टेबल टेनिस असोसिएशन, जेईएस महाविद्यालय, एनसीसी, विप्र समाज, जनता हायस्कूल, जैन प्राथमिक शाळा, टेंभुर्णी मॉर्निंग ग्रुप, मॉर्निंग क्लब, जेठमल नगर कॉलनी व व्यापारी महासंघाच्यावतीनेही काबरा यांच्या दुर्दम्य इच्छाशक्ती, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण परिश्रमांचा गौरव करण्यात आला.

सेवानिवृत्तीनंतर बहुतांश लोक शांत जीवन जगणे पसंत करतात; मात्र प्राचार्य काबरा यांनी फिटनेसलाच आपले ध्येय बनवले. यापूर्वी त्यांनी कोलकाता ते बांगलादेश आंतरराष्ट्रीय सायकल यात्रा आणि एव्हरेस्ट बेस कॅम्पचे ट्रेकिंग यशस्वीपणे पूर्ण केले आहे. आता उमलिंगला पासवरील जागतिक विक्रमाने त्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या या अफाट ऊर्जेमुळे आज शहरातील शेकडो युवक प्रेरित होऊन सायकलिंग आणि रनिंगकडे वळत असून, ते खऱ्या अर्थाने तरुणाईचे रोल मॉडेल ठरले आहेत.

# प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी यांचा रविवारी जालन्यात ७१ वा भव्य पुण्यतिथी महोत्सव

**जालना - प्रतिनिधी**

पार्श्व पवित्र सेवा समिती व सकल जैन समाजाच्यावतीने दिगंबर जैन समाजाच्या आध्यात्मिक परंपरेतील विसाव्या शतकातील दिगंबर जैन साधू परंपरेचे प्रमुख आधारस्तंभ प.पू. चारित्र चक्रवर्ती प्रथमाचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज यांचा ७१ वा पुण्यतिथी महोत्सव रविवार दि. १३ सप्टेंबर रोजी रुक्मिणी गार्डनमध्ये आयोजित करण्यात आला आहे.



हा महोत्सव प. पू. वात्सल्यमूर्ती आचार्य श्री १०८ पवित्रसागरजी महाराज, संघस्थ पू. मुनिश्री प्रशांतसागरजी महाराज व पू. मुनिश्री प्रभावसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात आणि दिलीप घेवारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. ध्वजारोहण जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते व फोटो अनावरण राहुल पालंबे, महावीर लव्हाडे, चंद्रकांतजी गुंगे यांच्याहस्ते, दीप प्रज्वलन अभिजीत वायकोस, पवन अंभुरे, कांचन काळदाते यांच्या हस्ते होणार आहे. साधार्मिक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे. सकाळी ७ वाजता कादराबाद येथील पार्श्वनाथ मंदिरात अभिषेक, ८ वाजता भव्य मिरवणूक, सकाळी ११.३० वाजता समाधी दिवस महोत्सव, दुपारी ३ वाजता मुनिसंघाचे आशिर्वचन, सायं. ४.३० वाजता वात्सल्य भोज आदी विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. प्रथमाचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज यांचा जन्म सन १८७२ मध्ये कर्नाटकातील येळगुड येथे झाला. जन्मनाव सातगौंडा होते. कठोर वैराग्य, त्याग आणि आत्मसाधनेच्या मार्गावर पुढे जात त्यांनी सन १९२० मध्ये मुनिदीक्षा स्वीकारली आणि सन १९२४ मध्ये प्रथमाचार्य पद प्राप्त केले. त्यांनी संपूर्ण भारतभर पायी विहार करून दिगंबर जैन साधू परंपरेला नवी ऊर्जा दिली. कठोर संयम, उपवास, अहिंसा, अपरिग्रह आणि आत्मसाधना यांचे त्यांनी आपल्या जीवनातून प्रत्यक्ष दर्शन घडविले. त्यांची प्रभावी साधना व चारित्र्यामुळे त्यांना 'चारित्र चक्रवर्ती' ही उपाधी प्राप्त झाली. त्यांच्या पावन स्मृती प्रित्यर्थ आयोजित पुण्यतिथी महोत्सवात जैन समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पवित्र धार्मिक महोत्सवाचा धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन पार्श्व पवित्र सेवा समिती जालना व सकल जैन समाज, जालनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जालना येथे अल्पसंख्यांक विकास जनजागृती अभियानाचे आयोजन

**जालना - प्रतिनीधी**

अल्पसंख्यांक प्रवर्ग मध्ये प्रामुख्याने मुस्लिम, ख्रिश्चन, सिख, जैन, पारशी, नवबौद्ध या समाजाचा समावेश होतो. व यांचेसाठी अल्पसंख्यांक विकास विभाग असा स्वतंत्र विभाग केंद्र व राज्य शासनामध्ये आहे. या विभागापूर्वी पंतप्रधान १५ कलमी अल्पसंख्यांक विकास कार्यक्रम हा जिल्हा अधिकारी कार्यालय मार्फत चालवला जात होता, २००५ मध्ये सच्चर समिती ने मुस्लिम समाजाचे सामाजिक सर्वेक्षण केले व त्यांचे शिफारसीनुसार केंद्र व राज्य सरकार मध्ये अल्पसंख्यांक विकास विभाग सुरु झाला, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वक्फ महामंडळ, अल्पसंख्यांक आयोग सुरु झाले, केंद्र व राज्य सरकारने अल्पसंख्यांक विकासाच्या योजना बनवल्या, परंतु या योजनाची जनजागृती शासन स्तरावर जरूरी प्रमाणात झाली नाही, याचबरोबर संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्देशनुसार १८ डिसेंबर अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करणेबाबत शासन व समाज उदासीन आहे, परिणामी अल्पसंख्यांक समाज हा मागास राहिला आहे. दिवसेंदिवस आपला भारत देश प्रगतीपथावर जात आहे, या राज्याचे लोकसंख्येच्या १८% असलेला अल्पसंख्यांक समाज विकसित होणे आवश्यक आहे, म्हणून देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक बांधिलकी च्या जाणीवेतून चचछत्र, महा मायनॉरिटी एनजीओ फोरम ही सामाजिक संस्था राज्यभर समाज विकासाच्या जनजागृतीचे काम २०१८ पासून करत आहे, शासन समन्वय करून समाजाच्या समस्या सोडवणेसाठी अराजकीय पद्धतीने संविधानिक मार्गाने प्रयत्नशील आहे, या सामाजिक कामाला यश देखील येत आहे, समाजाची प्रगती, देशाची प्रगती यासाठी चे जनजागृती अभियान जालना या शहरात दि. १४ रोजी येत आहे, यनिमित्त डिसीए क्लासेस, दर्गा रोड, एमएसईबी कार्यालयासमोर, दर्गा चौक जुना जालना येथे सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत अल्पसंख्यांक विकास योजना मार्गदर्शन व चर्चासत्र जालना ज़िल्हा शाखेच्या वतीने आयोजित केले आहे, अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी हा कार्यक्रम खूप दिशादर्शक ठरेल, म्हणून या अल्पसंख्यांक विकास मार्गदर्शनाचा लाभ घेणेसाठी अल्पसंख्यांक समाज बांधव, संस्था, ट्रस्टी, सामाजिक नेते यांनी कार्यक्रमांस उपस्थित राहावे असे आवाहन चचछत्र जिल्हा अध्यक्ष शेख चाँद पी.जे., कार्याध्यक्ष वसीम खान यांनी केले आहे.



बैलपोळा सणानिमित्त जालना जिल्ह्यातील देवपिंपळगाव येथील बाबुरावजी ननावरे यांच्या घरी बैलांना सजवून त्यांची पूजा करून पोळा सण साजरा करण्यात आला छायाचित्र अनिल व्यवहारे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.